वाचा:- १) शासन निर्णय क्रमांक सा.प्र.वि.एसआरव्हि /१०९५/प्र.क्र.१/९५/१२,दि.०८-६-९५
२) शा.नि.क्र.आकृवि १२९८/प्रक्र ६१/१५-ए,दि.२९.५.१९९८
३) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वेतन ११९९/प्र.क्र२/९९/सेवा-३,दि.२०.७.०१
४) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वेतन /२००२/प्र.क्र१/सेवा-३,दि.११.१.२००२
५) कृषि व पदुम विभाग पत्र क्र आकृवि/१२०२/प्र.क्र४७१/१५ ए,मंत्रालय मुंबई-३२, दिनांक २ जुलै २००२
६) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा-३,दि.०१/०४/२०१०
७) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वेतन-११११/प्र.क्र.८/सेवा-३,दि.०१/०७/२०११.
८) सा.प्र.वि.शासन परीपत्रक क्र.बीसीसी-२०१२/प्र.क्र.३३२/१२/१६-ब,दि.१८.०५.१३.

**: आदेश :**

उपरोक्त अ.क्र.(२) वरील शासन निर्णयाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारात कृषि पर्यवेक्षक पदावरुन महाराष्ट्र कृषि सेवा गट -ब(क) या संवर्गात पदोन्नत झालेल्या व कालबध्द पदोन्नती योजने अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या पहिल्या लाभापासून नियमित सेवेची बारा वर्षे सेवा पूर्ण करणा-या खालील अधिका-यांना पदोन्नती साखळीतील **महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब** या पदोन्नतीच्या पदाची वेतन बँड मधील वेतनश्रेणी **रुपये-९३००-३४८००** ग्रेड पे **रु.४६००** रकाना क्रमांक-४ मध्ये दर्शविलेल्या दिनांका पासून मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिका-यांचे नांव सर्वश्री./श्रीमती | संभाग | वरिष्ठ वेतनश्रेणी देय दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १. | निळकंठ किसन अभंग | पुणे | ०१.१०.२००६ | वि.चौ. अधिन |
| २. | रविंद्र जानरावजी नागपुरे | अमरावती | ०१.०६.२००७ | वि.चौ. अधिन |
| ३. | प्रदीप चंपतराव वानखेडे | अमरावती | ०१.१०.२००६ | वि.चौ. अधिन |

उपरोक्त कर्मचा-यांना देण्यात आलेली साखळी पदोन्नतीची वेतन श्रेणी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

१. सदरहू वेतन श्रेणी वरील रकाना क्रमांक-४ मध्ये दर्शविण्यात आलेल्या देय दिनांकापासून अमंलात येईल.

२. सदर योजना दि.०१/१०/२००६ पासून लागू करण्यात आली असल्यामुळे दि.०१/१०/२००६ ते दि.०१ एप्रिल २०१० पर्यंत काल्पनिकरित्या वेतननिश्चिती करुन प्रत्यक्ष लाभ दि.०१ एप्रिल २०१० पासून अनुज्ञेय राहिल. मात्र दि.०१/१०/२००६ ते दि.३१/०३/२०१० या कालावधितील थकबाकी अनुज्ञेय रहाणार नाही.

३. सदरहू पदोन्नतीमुळे जबाबदारी आणि कर्तव्ये यात वाढ होत नसली तरी नियमीत पदोन्नती प्रमाणे वेतन निश्चितीत लाभ देण्यात येत आहे. मात्र वेतन निश्चितीत मिळालेला हा लाभ त्या श्रेणीत कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यावर पुन्हा देय होणार नाही.

४. जर एखाद्यास विशेष वेतन मिळत असेल तर या योजनेखाली पदोन्नतीनंतर त्यास मुळ वेतन श्रेणीतील विशेष वेतन अनुज्ञेय राहणार नाही.

५. या योजने अंतर्गत पदोन्नती मिळाली तरी कर्मचा-याचे नांव कनिष्ठ संवर्गाच्या ज्येष्ठता सूचीतच राहील.

६. या आदेशाने देण्यात आलेली साखळी पदोन्नती ही फक्त आर्थिक लाभापुरतीच मर्यादित असून नियमीत पदोन्नतीच्या पदावर हक्क सांगता येणार नाही.

७. उपरोक्त कर्मचा-यांची वेतन निश्चिती करताना शासन निर्णय क्रमांक सा.प्र.वि.एसआरव्हि/१०९५/प्र.क्र.१/९५/१२,दि.८.६.९५ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे बंधपत्र लिहून देणे सक्तीचे आहे. त्याप्रमाणे संबधितांकडून बंधपत्र प्राप्त करुन घेऊन एक प्रत सेवापुस्तकात चिटकवावी व एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

८. भविष्यात कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यानंतर व ती नाकारल्यास संबधिताकडून सुधारीत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ काढून घेण्यात येईल.

९. नियमित पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या तसेच नियमित पदोन्नती नाकारलेल्या कर्मचा-यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील, अशा लाभांची वसुली करण्यात येईल. सदर वसुलीची संपूर्ण जबाबदारी संबंधित आस्थापना अधिका-यांची राहील.

१०. वरील कारणाने या योजनेखाली देण्यात आलेले लाभ काढून घेतल्यास संबंधित कर्मचा-यांची वेतन निश्चिती जणू काही या योजनेचे लाभ दिलेले नव्हते असे समजून महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम १२ च्या तरतुदी नुसार करण्यात येईल.

११. ज्या कर्मचा-यांचे विरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु असेल अशांचे बाबतीत शा.नि.साप्रवि क्र.एसआरव्हि १०९५/प्र.क्र-२९/९५/१२ दि.२२.४.९६ च्या निर्णयाचे अधिन राहुन कार्यवाही करण्यांत यावी.

१२. वरील आदेशातील कर्मचा-यांच्या सेवाविषयक बाबींची (विलेप,प्रथम लाभ देय दिनांक ई.) त्यांच्या मुळ सेवा पुस्तकावरुन पडताळणी करुनच पुढील वेतननिश्चिती करावी.

१३. मागासवर्गीय कर्मचा-यांचे बाबातीत त्यांनी वैधता प्रमाणपत्र सादर केल्याबाबत खात्री केल्यानंतरच या योजनेचे लाभ त्यांना अनुज्ञेय करण्यात यावेत.

१४. वरील निकष जे कर्मचारी पुर्ण करीत नाहीत त्यांची वेतननिश्चिती न करता याबाबतचा सविस्तर अहवाल आस्थापना विभागास सादर करावा. व वरिल सर्व बाबींची पुर्तता होत नसतांनाही त्यांनी वरिष्ठ वेतनश्रेणीत वेतन निश्चित केल्याचे निदर्शनास आले तर संबंधितास जबाबदार धरण्यात येईल.

स्वाक्षरित/-
आयुक्त कृषि
महाराष्ट्र राज्य,पुणे-१

**पुणे** - ४११००१
**दिनांक** : २५/०८/२०१५

०००००

जाक्र.कृआ/सेआप्रयो/गट-ब(क)/प्रक्र६८/२०१०/११९० /आ६(कक),
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे-४११ ००१, दिनांक २८/०८/२०१५

**प्रत,**

१) मा.विभागीय कृषि सहसंचालक/कोषागार अधिकारी (पुणे,अमरावती)
२) मा.जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सोलापूर,अमरावती)
३) कोषागार अधिकारी व्दारा मा.जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सोलापूर,अमरावती)
४) मा.वरिष्ठ प्रशासन अधिकारी,आस्थापना-१ / २
५) प्रशासन अधिकारी आस्थापना-३/४/५
६) सहाय्यक संचालक,लेखा-१ (वेतन व भत्ते)
७) कार्यासन अधिकारी,आस्थापना-५ (गोपनीय)
८) संबधित अधिकारी (सर्व)
९) अभिलेख अधिकारी, यांना **http://www.mahaagri.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी.

टिप: सदर आदेशाची प्रत http://www.mahaagri.gov.in/level3disp.aspx?id=29&subid=6 या लिंकवर प्राप्त होईल.

कृषि उपसंचालक,
कर्मचारी कल्याण कक्ष,
कृषि आयुक्तालय,म.रा.,पुणे-१